पाहिजेत
सार्वमंथन न्युज महाराष्ट्र चॅनेलसाठी
अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी तालुक्यासह प्रत्येक तालुक्यात
न्युज रिपोर्टर व कॅमेरामन
जागा भरणे आहे. आकर्षक पगारासह इतर सुविधा दिल्या जातील. इच्छुकांनी खालील क्रमांकावर संपर्क करावा.
दै. सार्व मंथन कार्यालय,
शिव चिंदबर कार्यालयाजवळ, बारागाव नांदुर रोड, राहुरी, जि. अहिल्यानगर. मो. 9822544072



सायं. दैनिक
# सार्व मंथन
नवी दिशा, नवी आशा
मुख्य संपादक : अनिल कोळसे, मो. ९८२२५४४०७२
इंटरनेट आवृत्ती : गुगल वर पहा www.sarvmanthan.in



आता लाडक्या बाळाच्या वाढदिवसाची जाहिरात

सायं. दैनिक सार्व मंथन नवी दिशा, नवी आशा
फ्री... फ्री... फ्री...
- अधिक माहितीसाठी आजच संपर्क करा -
9822544072
9370948911
* नियम व अटी लागू



। अहिल्यानगर । वर्ष ५ वे । अंक १७० वा । शुक्रवार, २३ जानेवारी २०२६ । पाने ४ । किंमत ३ रुपये । RNI No. MAH/MAR/2016/72596 । sarvmanthan16@gmail.com ।




**बाजारभाव : सोने**
२२ कॅरेट-१,४०,४००/-
हॉलमार्क
२४ कॅरेट-१,५१,०००/-



**बाजारभाव : चांदी**
१ किग्रॅ-२,९६,५००/-
सोने-चांदी अधिक जीएसटी वेगळा

**राहुरी बाजार समिती**
**कांदा आवक भाव**

| | |
|---|---|
| आवक | १८००० |
| नं. १ कांदा | १२०० ते १८०० |
| नं. २ कांदा | ८०० ते १२०० |
| नं. ३ कांदा | १०० ते ८०० |
| गोल्टी | १०० ते १२०० |
| एक्स्ट्रा सुपर क्वॉलिटी | १८५० |

### शैली

हिंदू हृदयसम्राटांची
अद्भुत ठाकरे शैली
ती जनमानसा वरती
अविरत जादू केली

शब्दाशब्दांत जाणवे
मराठी मातीची ओली
दूरदर्शी विचार सार्थ
सागरा परिस खोली

उभे रहायची लकब
भाषणा आधी टाळी
ऐकता विचार धारा
लागे ब्रह्मानंदी टाळी

हतबध्द होती सगळे
टिकाकारांची टोळी
शरणागत उन्मत ते
पायावर घेती लोळी

भितीचा ना लवलेश
वाघ का घाबरे मुळी
शतहत्ती शक्ती मिळे
राहील कोण दुबळी

आयुर्भाव त्वेष जोश
भलेभले होती खुळी
विरोधक गप्पगुमान
अंगलट त्याची खेळी

विसरे ना कधी तुम्हां
आठवण मना जाळी
विचार आचारा येता
भगव्या नव झळाळी

- हेमंत मुसरीफ, पुणे
९७३०३०६९९६

## दावोस जागतिक आर्थिक परिषदेतून
# राज्यात कोटींची गुंतवणूक

**मुंबई**
सार्व मंथन । वृत्तसेवा



- मुख्यमंत्री फडणवीस यांची माहिती
- १८ देशांतून होणार गुंतवणूक
- टाटा करणार १ लाख कोटींची गुंतवणूक

**दावोस येथील जागतिक आर्थिक परिषदेत राज्य सरकारने विविध क्षेत्रांतील गुंतवणुकीसाठी विक्रमी ४० लाख कोटी रुपयांचे सामंजस्य करार केले. यातील ३० लाख कोटी रुपयांचे करार प्रत्यक्षात तर, १० लाख कोटींच्या करारांबाबत प्राथमिक बोलणी झाली असून, एक-दोन महिन्यांत ते करार केले जातील, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दूरदृश्यप्रणालीद्वारे गुरुवारी घेतलेल्या पत्रकार परिषदेत दिली.**

फडणवीस म्हणाले की, १८ देशातून ही गुंतवणूक येत आहे. यात अमेरिका, युके, स्वीडन, जपान, इटली, जर्मनी, फ्रान्स, युएई, डेनमार्क, फिनलंड, नॉर्वे, सिंगापूर आदी देशांतील कंपन्या आहेत. इथल्याच कंपन्यांसोबत दावोसमध्ये जाऊन करार केले जात असल्याच्या टीकेबद्दल मुख्यमंत्री म्हणाले की, महाराष्ट्राचे यश पाहावत नाही, अशा काही लोकांनी पेड टूलकिट तयार केले आहे. मुंबईतील कंपन्यांबरोबर दावोसमध्ये करार, असे मेसेज तयार करून पोस्ट केले जात आहेत. या मागे कोण आहे, ते माझ्या लक्षात येत आहे.

एक टूलकिट चालले लोढांच्या मुलाने दावोसला येऊन करार का केला? अभिषेक लोढा हे देशातील प्रथितयश उद्योजक आहेत. त्यांनी केलेल्या करारामुळे लोढाची इस्टेट तयार होत नाही. जगातील ४ महत्त्वाच्या कंपन्या डेटा सेंटरमध्ये गुंतवणूक करत आहेत. त्यामुळे मुंबई डेटा सेंटरमध्ये नंबर वन वर येणार आहे. या करारात ८० टक्के परकीय गुंतवणूक असून, लोढा यांची २० टक्के जमिनीच्या रूपाने गुंतवणूक आहे. टाटांसोबत देशातील पहिली इनोव्हेशन सिटी मुंबईजवळ तयार करणार आहोत. येणाऱ्या ६ ते ८ महिन्यात याचे सविस्तर नियोजन होईल. ही संकल्पना गेल्याच वर्षी दावोसमध्ये आली होती. टाटा सन्सचे एन. चंद्रशेखरन यांच्यासोबत याबाबत चर्चा झाली. यासाठी १ लाख कोटींहून अधिक गुंतवणूक टाटा करणार आहेत. इतरही अनेक देशातील गुंतवणूकदार यासाठी गुंतवणूक करणार आहेत, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकारांना म्हंटले आहे.

दावोसमध्ये आयोजित वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममध्ये महाराष्ट्राने ४० लाख कोटी रुपयांचे गुंतवणूक करार केले असून, आणखी १० लाख कोटींच्या गुंतवणूक करारांची प्राथमिक बोलणी पूर्ण झाली असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

## राहुरी विधानसभा मतदार
# नोंदणीसाठी फक्त २ दिवस शिल्लक
### २४ जानेवारी अंतिम मुदत

**अहिल्यानगर**
सार्व मंथन । प्रतिनिधी

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राहुरी विधानसभा मतदारसंघात सुरू असलेल्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत मतदार नोंदणी आणि यादीतील तपशील दुरुस्तीसाठी आता अवघे दोन दिवस शिल्लक राहिले आहेत. दावे व हरकती स्वीकारण्याची अंतिम मुदत २४ जानेवारी २०२६ रोजी संपुष्टात येत असल्याने, पात्र नागरिकांनी या सुविधेचा त्वरित लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

१ जानेवारी २०२६ या अर्हता दिनांकावर आधारित या विशेष मोहिमेअंतर्गत ६ जानेवारी रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली होती. सध्या दावे आणि हरकती स्वीकारण्याची प्रक्रिया सुरू असून, प्राप्त अर्जांवर ७ फेब्रुवारीपर्यंत निर्णय घेऊन १४ फेब्रुवारी २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे. या मोहिमेत १ जानेवारी २०२६ रोजी वयाची १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या नवमतदारांना 'नमुना नं. ६' भरून नाव नोंदणी करता येईल. तसेच, मतदार

पान ४ वर

## महापौर सोडतीवरून ठाकरे गट नाराज

सार्व मंथन ✍ मुंबई । महापौरपदातून एसटीला डावलण्यात आलं आहे. एसटीचं आरक्षण का ठेवलं नाही? एसटीसाठीच्या चिठ्ठ्या का टाकल्या नाहीत? असा संतप्त सवाल ठाकरे गटाच्या प्रवक्त्या पेडणेकर यांनी केला आहे. काँग्रेस नेत्यांनीही आरक्षण सोडतीवरून राज्य सरकारवर जोरदार निशाणा साधला आहे.

## 'महा निर्यात इग्नाइट' मधून उद्योजकतावाढीस चालना : गिते



**अहिल्यानगर**
सार्व मंथन । प्रतिनिधी

उद्योगांना प्रोत्साहन देऊन आर्थिक विकासाला गती देण्यासाठी आयोजित 'महा निर्यात इग्नाइट कन्व्हेन्शन २०२६'च्या माध्यमातून उद्योजकता व निर्यातवाढीस निश्चित चालना मिळेल, असा विश्वास निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते यांनी व्यक्त केला.

शहरातील हॉटेल यश ग्रँड येथे 'महा निर्यात इग्नाइट कन्व्हेन्शन २०२६'चे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी गिते बोलत होते.

कार्यक्रमास उद्योग विभागाच्या सहसंचालक वृषाली सोने, प्रादेशिक संचालक डॉ. विवेक बक्षी, महाव्यवस्थापक दीपक शिवदास, जयद्रत खताळ, अरविंद पारगावकर, हरजितसिंग वाधवा, अरुण खामेरे, उद्योग अधिकारी अशोक बेनके, श्याम बिराजदार आदी उपस्थित होते.

गिते म्हणाले, आजच्या जागतिकीकरणाच्या व सतत बदलत्या आर्थिक परिस्थितीत उद्योजकता व

पान ४ वर

# शेतकऱ्याची एक इंचही जमीन जावू देणार नाही!
### माजीमंत्री तनपुरे; राहुरी-शनिशिंगणापूर प्रस्तावित रेल्वे महामार्गास विरोध

**राहुरी**
सार्व मंथन । विशेष प्रतिनिधी



प्रस्तावित राहुरी-शनिशिंगणापूर रेल्वे महामार्गामुळे एकाही शेतकऱ्याची जमीन जाणार नाही. शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी वेळप्रसंगी तीव्र स्वरूपाचे आंदोलन हाती घेतले जाईल, असा इशारा माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी प्रशासनाला दिला आहे.

राहुरी ते शनिशिंगणापूर दरम्यान सुमारे वीस किलोमीटर अंतराचा रेल्वे महामार्ग प्रस्तावित असून या प्रकल्पामुळे मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांच्या सुपीक जमिनी जाण्याची भीती व्यक्त केली जात आहे. या महामार्गामुळे शेतकऱ्यांवर मोठे संकट ओढवणार असल्याने हा प्रकल्प तात्काळ रद्द करण्यात यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. या मागणीसाठी शेतकऱ्यांच्या वतीने प्रांताधिकारी डॉ. किरण सावंत यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी शिवसेना शेतकरी सेनेचे रवी मोरे, साहेबराव म्हसे, सुनील आडसुरे, बाबासाहेब वने, साहेबराव महाडिक, दिलीप चव्हाण, सोपान दुशिंग, अच्युत दुशिंग, जालिंदर भिसे, योगेश राजदेव, रवी तारडे, शरद पेरणे, संभाजी शिरसाठ, रमेश ढोकणे, किशोर पवार, भास्कर पवार, शिवाजी शिरसाठ, ताराबाई म्हसे, विनोद ढोकणे, शिवाजी ढोकणे, दत्तात्रय भिसे, भाऊसाहेब भिसे, बाळासाहेब पटारे, गोरक्षनाथ वाघ, सीताराम पटारे आदिंसह शेतकरी उपस्थित होते.

# राहुरी नगरपरिषदेच्या विरोधी पक्षनेतेपदी साळवे

**राहुरी**
सार्व मंथन । प्रतिनिधी



राहुरी नगरपरिषदेच्या विरोधी पक्षनेतेपदी नगरसेवक अरुण मोहन साळवे यांची निवड करण्यात आली आहे.

राहुरी नगरपरिषदेतील भारतीय जनता पक्षाच्या सात सदस्यांनी मुख्याधिकारी अभिजीत हराळे यांना ही निवड पत्राद्वारे कळवण्यात आली. पालिकेत माजी राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे यांच्या नेतृत्वाखाली १७ नगरसेवक निवडून आले असून, भाजपाच्या विकास आघाडीचे सात सदस्य सध्या नगरपरिषदेतील कामकाजात सक्रिय आहेत.

पालिकेत भाजप पक्षाचे गटनेते म्हणून चंद्रकांत उर्फ राजेंद्र ऊंडे यांची निवड झाली आहे, तर विरोधी पक्षनेतेपदी अरुण साळवे यांची निवड करण्यात आली. या वेळी भाजपाच्या पदाधिकाऱ्यांनी अरुण साळवे यांचा सत्कार केला.

यावेळी गणेश खैरे, सचिन मेहेत्रे, सुनील पवार, अजित डावखर, कांतीलाल जगधने, नारायण धोंगडे, सतिष फुलसौंदर, सुनील देशमुख आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. विरोधी पक्ष नेतेपदी निवड झाल्याबद्दल अरुण साळवे यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.


विश्वसनीय अर्थसेवा येत आहे..
आराध्य दैवत कानिफनाथ महाराज बारागाव नांदुरच्या पावन भूमीत...
साई आदर्श
को. ऑप. क्रेडीट सोसायटी लि. राहुरी
बारागाव नांदुर शाखा उद्घाटन सोहळा
शनिवार, दि. २४ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १० वा.
स्थळ : बारागाव नांदुर, बाजारतळ, ता.राहुरी, जि. अहिल्यानगर.
- शुभहस्ते -
महंत उध्दवजी महाराज मंडलीक
अध्यक्ष, नारायणगिरी आश्रम सुरेगाव, ता. नेवासा
- कार्यक्रमाचे अध्यक्ष -
मा.श्री. सुरेशराव वाबळे
अध्यक्ष, मल्टीस्टेट फेडरेशन
- प्रमुख उपस्थिती -
मा.श्री. संजय ठेंगे
पोलीस निरीक्षक, राहुरी
तसेच सर्व ग्रामस्थ बारागाव नांदुर व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होत आहे. तरी आपण या कार्यक्रमास आवर्जुन उपस्थित रहावे ही विनंती.
- स्वागतोत्सुक -
श्री शिवाजीराव शंकराप्पा कपाळे
संस्थापक - साई आदर्श परिवार


## व्याज फेडूनही २ महिला सावकारणींच्या,
# मानसिक छळा कंटाळून तरुणाची आत्महत्या
### राहुरीत पुन्हा सावकारकीने काढले वर डोके

**राहुरी**
सार्व मंथन । विशेष प्रतिनिधी

व्याजाने घेतलेले सर्व पैसे फेडूनही कोरे चेक अडवून धरत पुन्हा दोन लाख रुपयांच्या व्याजाची बेकायदेशीर मागणी, अर्वाच्य भाषेत शिवीगाळ, दमदाटी आणि जीवे मारण्याच्या धमक्यांमुळे अखेर एका निष्पाप व्यक्तीला आपला जीव गमवावा लागल्याची धक्कादायक घटना राहुरी तालुक्यात उघडकीस आली आहे.

बेकायदेशीर सावकारकीचा हा काळा अध्याय म्हणजे प्रशासन आणि समाज व्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करणारा आहे.

सात्रळ (ता. राहुरी) येथील शंकर बाबुराव होले (वय ५२) यांनी वैयक्तिक गरजेसाठी आरोपी महिला सावकार सविता ज्ञानेश्वर पोटे हिच्याकडून व्याजाने पैसे घेतले होते. होले यांनी वेळोवेळी मूळ रक्कम व व्याज पूर्ण फेडले. तसेच गणेश आप्पासाहेब थोरात यांच्या पत्नींकडून हातउसने घेतलेली रक्कमही मुदतीत परत केली. यावेळी १३ ऑगस्ट २०२५ रोजी दिलेले दोन चेक परत मागितले असता, कोरे चेक परत देणार नाहीत असा उघड दम देण्यात आला.

पैसे देणे-घेणे संपले असतानाही ३१ डिसेंबर २०२५ रोजी दोन्ही सावकार महिला होले यांच्या घरी जाऊन आजच पैसे दे, नाहीतर परिणाम भोग अशी धमकी देत अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करून निघून गेल्या. त्यानंतर ३ जानेवारीपासून सातत्याने फोनवरून पैशाचा तगादा लावण्यात आला. या अमानुष मानसिक छळामुळे शंकर होले प्रचंड तणावात गेले.

अखेर ४ जानेवारी २०२६ रोजी सकाळी त्यांनी विषारी औषध प्राशन केले. लोणी येथील रुग्णालयात उपचार सुरू असतानाही आरोपी महिलांनी तेथे जाऊन आमचे नाव कुठेही घेऊ नका, नाहीतर तुमचे जगणे मुश्किल करू अशी उघड धमकी दिल्याचा गंभीर आरोप आहे. उपचार सुरू असतानाच ७ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता शंकर होले यांचा मृत्यू झाला.

या प्रकरणी मयताचा मुलगा गणेश शंकर होले (वय २७) यांनी राहुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून, आरोपी सविता ज्ञानेश्वर पोटे (रा. पाटा जवळ, श्रीरामपूर) व गणेश आप्पासाहेब थोरात यांची पत्नी (रा. घुलेवाडी, संगमनेर) यांच्याविरोधात गुन्हा रजि. नं. ५७/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम १०८, ३५२, ३५१(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

### 'त्या' सावकारांच्या मुसक्या कोण आवळणार?

राहुरी शहरासह तालुक्यातही अनके सावकारांनी हैदोस घातला असून या सावकारांच्या त्रासापायी अनेकांनी पोलीस ठाण्याचा दरवाजा ठोठावला. सततच्या त्रासामुळे आत्महत्या झाल्या तर काहिंनी आत्महत्येचा प्रयत्न केला. तर काहींच्या तक्रारी पोलीस ठाण्यात धुळखात पडुन आहेत तर काही न्यायालयात न्याय मागत आहे. यामुळे पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांनी आता सावकारांच्या मुसक्या आवळाव्यात, अशी सावकारांच्या त्रासाला कंटाळलेल्या पिडीतांकडून मागणी होत आहे.

### बेकायदेशीर सावकार मोकाट कसे?

कोरे चेक अडवून धमकावण्याचे धाडस कुणाच्या आशीर्वादाने? एका कुटुंबाचा कर्ता गमावल्यानंतर प्रशासन जागे होणार का? ही घटना केवळ आत्महत्येची नसून, सावकारकीच्या दहशतीखाली गुदमरून गेलेल्या व्यवस्थेचा आरसा आहे. दोषींवर कठोर कारवाई झाली नाही, तर उद्या आणखी किती शंकर होले सारखे किती बळी जाणार? हा प्रश्न अनुत्तरितच आहे.


राहुरीत लवकरच ती येतेय...!
खुशखबर..! खुशखबर..! खुशखबर..!

आता, नाशिक, पुणे, औरंगाबादला जाण्याची गरज नाही.
आपल्या राहुरी शहरात नव्याने सुरु होत असलेल्या
जनसेवा® MOTORS घेऊन येत आहे.
ई-बाईक २ व ३ व्हिलरचे भव्य दालन
ॲडव्हान्स बुकिंग ऑफर


जुने बसस्थानकाजवळ, बारागाव नांदूर रोड, राहुरी, जि. अहिल्यानगर
आजच संपर्क साधा.
9209100120
9404165877



## संपादकीय...

मो. ९८२२५४४०७२

# ‘लाडकी बहीण योजना’ व्यवस्थेचा गुंता?

लाडकी बहीण योजना ही राज्य सरकारची महत्त्वाकांक्षी आणि महिलांसाठी दिलासा देणारी योजना म्हणून जाहीर करण्यात आली. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या योजनेमुळे सरकारला राजकीय लाभही झाला, हे वास्तव नाकारता येणार नाही. योजनेच्या सुरुवातीच्या टप्प्यात पात्र महिलांच्या खात्यात नियमितपणे आर्थिक मदत जमा होत होती. त्यामुळे अनेक कुटुंबांना आधार मिळाला आणि महिलांमध्ये सरकारबद्दल विश्वास निर्माण झाला. मात्र, हा विश्वास फार काळ टिकला नाही. केवायसी सक्तीची करण्यात आल्यानंतर योजनेतील त्रुटी आणि प्रशासनाचा असंवेदनशील चेहरा उघड झाला. कोणतीही स्पष्ट पूर्वसूचना न देता, केवळ एका चुकीच्या क्लिकमुळे हजारो महिला अचानक अपात्र ठरल्या. ही बाब अत्यंत गंभीर आणि विचार करण्यास भाग पाडणारी आहे. केवायसी प्रक्रियेदरम्यान विचारण्यात आलेले प्रश्न हे एमपीएससीच्या परीक्षेच्या धर्तीवर असल्यासारखे होते. उदाहरणार्थ ‘‘माझ्या कुटुंबातील कोणताही सदस्य राज्य सरकारच्या स्थानिक संस्थेत कायम कर्मचारी नाही किंवा सेवानिवृत्तीनंतर निवृत्तीवेतन घेत नाही.’’ या एका वाक्यातच दोन अटी, दुहेरी नकार आणि तांत्रिक भाषा वापरण्यात आली. परिणामी अनेक महिलांचा मोठा गोंधळ उडाला. घरातील कोणीही शासकीय नोकरीत नसल्यामुळे महिलांनी प्रामाणिकपणे ‘‘नाही’’ असे उत्तर दिले. मात्र, प्रत्यक्षात निवृत्तीवेतन घेत नाही या भागासाठी ‘‘होय’’ असे उत्तर अपेक्षित होते. या भाषिक क्लिष्टतेमुळे महिला अपात्र ठरल्या. महत्त्वाचा प्रश्न असा आहे की, या योजनेचा लाभ घेणाऱ्या सर्व महिला सुशिक्षित आहेत का? ग्रामीण भागातील, अल्पशिक्षित, कष्टकरी महिला डिजिटल प्रक्रियेत पारंगत असतील अशी अपेक्षा करणे म्हणजे वास्तवापासून दूर जाणे होय. सरकारने योजना आखताना लाभार्थ्यांची सामाजिक व शैक्षणिक पार्श्वभूमी लक्षात घेणे आवश्यक असते. येथे मात्र तसे झालेले दिसत नाही. ही योजना महिलांसाठी आहे, पण प्रक्रिया मात्र केवळ कागदोपत्री आणि संगणकीय निकषांवर आधारित ठेवण्यात आली. मानवी दृष्टिकोनाचा पूर्ण अभाव यातून दिसून येतो. एका चुकीच्या क्लिकमुळे आर्थिक मदत थांबवणे म्हणजे महिलांच्या जगण्यावर गदा आणण्यासारखे आहे. सरकारने आता तरी याची गंभीर दखल घेणे आवश्यक आहे. केवायसीतील प्रश्न सोप्या, स्पष्ट आणि स्थानिक भाषेत असावेत. अपात्र ठरलेल्या महिलांना पुन्हा दुरुस्तीची संधी द्यावी ग्रामपातळीवर मदत केंद्रे सुरू करावीत आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, योजना ही लोकांसाठी असते, लोकांनी व्यवस्थेसाठी झगडण्यासाठी नसते हे प्रशासनाने लक्षात घ्यावे. अन्यथा, ‘लाडकी बहीण योजना’ ही नावापुरती लाडकी राहील आणि प्रत्यक्षात मात्र व्यवस्थेच्याच जाळ्यात अडकलेली एक अपयशी योजना ठरेल.

# अवैध वाळू वाहतूक करणाऱ्यांविरुध्द गुन्हे शाखेची कारवाई

## ८२,४०,००० किंमतीचा मुद्देमाल जप्त



**अहिल्यानगर**
सार्व मंथन । प्रतिनिधी

पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी पोनि किरणकुमार कबाडी, स्थागुशा अहिल्यानगर यांना जिल्ह्यातील अवैध वाळु वाहतुकीविरुध्द कारवाई करणेबाबत आदेशित केले होते.

नमुद आदेशान्वये पोनि किरणकुमार कबाडी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोउपनिसमीर अभंग पोलीस अंमलदार हृदय घोडके, बिरप्पा करमल, श्यामसुंदर जाधव, भाऊसाहेब काळे, अमोल कोतकर यांचे पथक तयार करुन अवैध वाळु उपसा व वाहतुक करणारे इसम ांविरुध्द कारवाई करणेकामी रवाना केले.दिनांक २०/०१/२०२६ रोजी वर नमुद पथक मिरजगाव पोलीस ठाणे हद्दीमध्ये अवैध वाळु उत्खनन/ उपसा बाबत माहिती काढत असताना पथकास गुप्त बातमीदारामार्फत नागापुर गावचे शिवारात नदीपात्रात जेसीबी व ट्रॅक्टर ट्रॉलीचे साह्याने चोरुन वाळु काढत असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर पथकाने सदर ठिकाणी जावुन खात्री केली असता सदर ठिकाणी दोन जेसीबीचे साह्याने तीन ट्रॅक्टर ट्रॉलीमध्ये गौण खनिज भरत असतांना दिसुन आले. तेव्हा पथकाने सदर ठिकाणी छापा टाकणे कामी जात असतांना तेथुन काही इसम पळुन गेले. व तेथे असलेल्या इसमांना पोलीसांची ओळख सांगुन त्यांना ताब्यात घेवुन त्यांचे नांव गावा विचारले असता त्यांनी त्यांचे नांव १) संदिप अशोक जाधव,वय– २७ वर्षे रा.खडकत, ता. आष्टी, जि.बीड, २) नितीन केरबा कापरे,वय– ३१ वर्षे रा. नागलवाडी ता.कर्जत, जि. अहिल्यानगर, ३) अलम निजामुद्दीन शेख ,वय– ३० वर्षे रा. बडाअरा बुजुर्ग, ता.तमकोहीराज, जि. देवरीया,उत्तर प्रदेश हल्ली रा. नागलवाडी, ता. कर्जत असे असल्याचे सांगितले. ताब्यातील इसमांकडे दोन ट्रॅक्टरवरील पळुन गेलेल्या चालकांचे नाव पत्ता विचारले असता त्याने त्यांचे नांव ४) अजय खेडर (पुर्ण नांव माहिती नाही),(फरार) ५) ऋषिकेश खेडकर (पुर्ण नांव माहित नाही) (फरार) दोघे रा. सांगवी ता.आष्टी, जि.बीड,असे असल्याचे सांगितले. त्याचेकडे वाळु वाहतुकीचे परवान्याबाबत विचारपुस करता त्याने त्याचेकडे कोणताही वाळु वाहतुकीचा परवाना नसल्याचे कळविले. ताब्यातील इसम नामे संदिप अशोक जाधव हा चालवित असलेल्या जेसीबीचे मालकाबाबत विचारपुस करता त्यांनी सांगितले जेसीबीचे मालक ६) संभाजी बाबुराव बांदल रा.नागलवाडी ता. कर्जत(फरार) असल्याचे सांगितले तसेच व अलम निजामुद्दीन शेख याचे ताब्यात मिळुन आलेल्या जेसीबीचे मालाबाबत विचारपुस करत त्याने सांगितले की, जेसीबा मालक ७) धनंजय बांदल (पुर्ण नांव माहित नाही) रा.नागलवाडी ता.कर्जत जि. अहिल्यानगर (फरार) असे असल्याचे सांगितले आहे.

दरम्यान५०,००,०००/–रुपयेकिंमतीचे दोन जेसीबी, २४०००,०००/–रु कि.चे तीन वेगवेगळ्या कंनपीचे ट्रॅक्टर ट्रॉली, ३०,०००/–रु कि.ची ३ ब्रास वाळु असा एकुण ७४,३०,०००/– रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असुन आरोपीविरुध्द पोकॉ/८०० भाऊसाहेब राजु काळे नेम – स्थानिक गुन्हे शाखा, अहिल्यानगर यांचे फिर्यादीवरुन मिरजगाव पोलीस ठाणे गु.र.नं. १८/२०२६ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०३(२), सह पर्यावरण कायदा कलम ३/१५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास मिरजगाव पोलीस स्टेशन करीत आहे.

तसेच वरील पथकाने खर्डा पोलीस ठाणे हद्दीमध्ये अवैध वाळु उत्खनन/ उपसा बाबत माहिती काढत असताना. दिनांक २१/०१/२०२६ रोजी पहाटे पथकास गुप्त बातमीदारा मार्फत खर्डा शहर परिसरात खर्डा ते भुम रोडवर गौण खनिज वाळुने भरलेला ट्रॅक्टर येणार असल्याची असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर पथकाने खर्डा बस स्टॅन्ड समोर जावुन सापळा रचुन थांबले असता एक ट्रॅक्टर येतांना दिसुन आले. तेव्हा पथकाने सदर ट्रॅक्टर थांबवुन चालकास पोलीसांची ओळख सांगुन त्यास ताब्यात घेवुन त्याचे नांव गाव विचारले असता त्याने त्याचे १) योगेश अण्णा सुरवासे वय– २८ वर्षे रा. खर्डा ता.जामखेड असे असल्याचे सांगितले आहे.

ताब्यातील इसमाचे कब्जातुन ८,००,०००/– रुपये किमतीचा एक ट्रॅक्टर ट्रॉली, १०,०००/–रु कि.ची १ ब्रास वाळु असा एकुण ८,१०,०००/– रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असुन आरोपीविरुध्द पोना/१५६६ श्यामसुंदर अंकुश जाधव नेम – स्थानिक गुन्हे शाखा, अहिल्यानगर यांचे फिर्यादीवरुन खर्डा पोलीस ठाणे गु.र.नं. ०९/२०२६ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०३(२), सह पर्यावरण कायदा कलम ३/१५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास खर्डा पोलीस स्टेशन करीत आहे.

# पाथर्डी शहरात दोरी-गंडा करणाऱ्यांवर कारवाईची मागणी

## अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे पोलीस व महसूल प्रशासनास निवेदन



**पाथर्डी**
सार्व मंथन । प्रतिनिधी

पाथर्डी शहरात अंधश्रद्धेच्या नावाखाली सुरू असलेल्या भोंदूगिरीविरोधात महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने ठोस भूमिका घेत संबंधितांवर तातडीने कारवाई करण्याची मागणी केली आहे. यासंदर्भात पोलीस स्टेशन पाथर्डी व तहसील कार्यालय पाथर्डी येथे लेखी निवेदन सादर करण्यात आले आहे.

पाथर्डी शहरातील चिंचपूर रोडवरील अजंठा चौकाच्या पुढे पश्चिम बाजूस, नवीन बांधकाम झालेल्या विविध कार्यकारी सोसायटीजवळ काही चपला दुरुस्तीचा व्यवसाय करणारे व्यक्ती चप्पल दुरुस्तीच्या आडून अंधश्रद्धेचे प्रकार करत असल्याचे निदर्शनास आले आहे. हे लोक समोर नारळ, उदबत्त्या, वादीचे नाडे ठेवून ‘‘लहान मुलांचे व महिलांचे आजार, भूतबाधा (बाहेर वसा) काढतो’’ असे सांगत मंत्र–तंत्राचा बनाव करीत आहेत. वादी–नाड्यावर मंत्र टाकून ते लहान मुलांच्या व महिलांच्या गळ्यात बांधणे, अंगारा देणे आदी प्रकारांद्वारे भोळ्या–भाबड्या नागरिकांची आर्थिक फसवणूक व मानसिक छळ केला जात असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचा देव किंवा धर्माला कोणताही विरोध नसून, देव–धर्माच्या नावाखाली सामान्य नागरिकांची फसवणूक करणाऱ्या प्रवृत्तीला समितीचा ठाम विरोध आहे. विज्ञानाच्या युगातही अशा प्रकारची अंधश्रद्धा समाजात रुजवली जात असून हा प्रकार अनेक वर्षांपासून सुरू असल्याने प्रशासनाने कठोर पावले उचलावीत, अशी मागणी करण्यात आली आहे.

या निवेदनावर महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे पाथर्डी तालुका अध्यक्ष वसंतराव बोर्डे, तालुका बुवाबाजी संघर्ष प्रमुख सुखदेव मर्दाने, अहिल्यानगर जिल्हा बुवाबाजी संघर्ष प्रमुख शशिकांत गायकवाड,सखाराम कुऱ्हाडे, हुमायुनभाई आतार, राजेंद्र कोटकर, डॉ. धनंजय फळे, डॉ. श्रीकांत काळोखे, सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र दुधाळ, डॉ. प्रा. राजकुमार घुले, आनंदजी पंडागळे, पांडुरंग काकडे, डॉ. कैलास दौंड, सामाजिक कार्यकर्ते एम. डी. ढाळे, शेख इजास आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

याशिवाय सामाजिक कार्यकर्ते किसन आव्हाड व इतर समविचारी संघटनांनीही या भोंदूगिरीला तीव्र विरोध दर्शवित महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या या चळवळीला व कृतीला जाहीर पाठिंबा दिला आहे.

अंधश्रद्धा निर्मूलन समितीने नागरिकांना आवाहन केले आहे की, कोणत्याही आजारासाठी तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घ्यावा व अंधश्रद्धेच्या नावाखाली फसवणूक करणाऱ्या व्यक्तींना बळी पडू नये. अशा प्रकारांचे निदर्शनास आल्यास त्वरित पोलीस प्रशासनाला माहिती द्यावी. ‘अंधश्रद्धा नको विज्ञाननिष्ठ समाज हवा’ हा संदेश समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचणे आवश्यक असल्याचे समितीने यावेळी ठामपणे नमूद केले आहे.

# सोनईचा ओंकार दरंदले औषध निर्माण अधिकारी

**सोनई**
सार्व मंथन । प्रतिनिधी

येथील मुळा संस्थेच्या औषध निर्माण शास्त्र महाविद्यालयाचे विद्यार्थी ओंकार नितीन दरंदले यांनी महाराष्ट्र राज्य शासनाने घेतलेल्या वैद्यकीय संशोधन व शिक्षण संचालन परीक्षेत औषध निर्माण अधिकारी म्हणून मराठा प्रवर्गात राज्यात दुसरा क्रमांक मिळवला आहे या निवडीबद्दल परिसरातून त्याचे सत्कार व कौतुक होत आहे.

सोनई येथील सामाजिक कार्यकर्ते व माजी ग्रामपंचायत सदस्य स्व. नितीन दरंदले यांचा ओंकार हा मुलगा आहे वडिलांच्या अपघाती विज्ञान नंतर मोठ्या कष्टातून त्यांनी यश मिळवले आहे त्याने पहिली ते बारावीपर्यंत मुळा संस्थेच्या शनिश्वर विद्यालयात शिक्षण घेतले आहे.

# मुळा कारखाना सोनई येथे अहिल्यानगर ई.पी.एफ.ओ.चा कॅम्प

**सोनई**
सार्व मंथन । प्रतिनिधी

दिनांक २७/१/२०२६ रोजी सकाळी ठीक दहा ते सायंकाळी पाच वाजेपर्यंत सोनई मुळा कारखाना येथे अहिल्यानगरचे एपीएफ ओचे अधिकारी हे सेवानिवृत्त कर्मचारी यांच्या प्रश्नासंदर्भात मार्गदर्शन करण्यासाठी येणार आहेत.

यामध्येनेवासातालुक्यातील साखर कारखाने, इडीसीसी बँक, सेवा सोसायटी, एसटी महामंडळ, एमएसईबी, दूध संघ, सार्वजनिक, खाजगी, सहकारी व इतर उद्योगातील कर्मचाऱ्यांच्या पी.एफ.च्या प्रश्नासंदर्भात मुळा कारखाना येथे येत आहेत मुळा कारखाना राष्ट्रीय साखर कामगार युनियन सोन ई यांचे सहकार्याने हा कॅम्प कारखाना साईटवर घेण्यात येत आहे.

यामध्ये ज्या सेवानिवृत्त कर्मचारी यांची पेंशन बंद झाली असल्यास व वारस नोंदीची समस्या किंवा सेवा निवृत्त होऊन सुद्धा पेंशन मिळत नसल्यास,प्रा.फंड रक्कमे विषयी कुणाची तक्रार असल्यास आपण समक्ष पी एफचे अधिकारी यांच्यासमोर मांडता येईल पेन्शनरांनी येताना मूळ कागदपत्र बरोबर ठेवावीत तरी नेवासा तालुक्यातील सेवानिवृत्त कर्मचारी यांनी या कॅम्प साठी अवश्य यावे असे आव्हान मुळा कारखाना राष्ट्रीय साखर कामगार युनियनचे अध्यक्ष अशोकराव पवार सरचिटणीस डी एम निमसे साहेब उपाध्यक्ष कारभारी लोडे खजिनदार सुभाष सोनवणे सरचिटणीस भारत पटारे कामगार प्रतिनिधी विश्वास डेरे, किशोर राजगुरू यांनी केले आहे.

मेष : दयाळूपणा आणि उदारता तुमचा दिवस निश्चित करतात. गरजूंना मदतीचा हात द्या किंवा तुमचे संसाधने इतरांसोबत वाटा. तुमची सद्गुणी कृत्ये सकारात्मकता आणि सद्भावना आकर्षित करून, बळकट करतात.

वृषभ : तुमच्या समस्या सोडवण्याच्या कौशल्याची चाचणी घेणारी एक गुंतागुंतीची पेचप्रसंग उद्भवू शकते. तुमचे पर्याय काळजीपूर्वक तोलून पहा आणि आव्हानाला तोंड देण्यासाठी विचारपूर्वक निवडी करा. आज तुमचा चेहरा कोरडा आणि नेहमीचा तेज गमावलेला वाटू शकतो.

मिथुन : स्थिरता आता भूतकाळातील गोष्ट आहे. नवीन संधी आणि नवीन सुरुवातींनी भरलेल्या प्रगतीशील दिवसाचा स्वीकार करा. तुमचे बाह्य तेज तुमच्या आतील चैतन्याचे प्रतिबिंब आहे हे जाणून, तंदुरुस्त आणि सुंदर असल्याचा आनंद घ्या.

कर्क : तुमचे सद्गुण तेजस्वीपणे चमकतील, सकारात्मकता आणि सद्भावना पसरतील. तुमच्या करुणामय कृतींना विश्वाकडून प्रतिसाद मिळेल, तुमच्यावर शुभेच्छा आणि हृदयस्पर्शी आश्चर्यांचे सूक्ष्म संकेत येतील.

सिंह : तुमच्या योजनांमधून विचलनाची अपेक्षा करा. विलंब, चुकीची जागा किंवा हरवलेले कागदपत्रे तुम्हाला त्रास देऊ शकतात. आव्हानात्मक दिवस टाळण्यासाठी सावधगिरी बाळगा. तुमचा सुंदर चेहरा असंख्य कौतुकांचा विषय असेल.

कन्या : शांतता आणि आनंद स्वीकारा. आजचा दिवस चिंतांपासून मुक्तता देतो, स्वतःची काळजी घेण्यावर, विश्रांतीवर आणि आनंददायी शांततेच्या क्षणांचा आनंद घेण्यावर लक्ष केंद्रित करण्याची संधी देतो.

तुळ : तुमचे सद्गुण तेजस्वीपणे चमकतील, सकारात्मकता आणि सद्भावना पसरतील. तुमच्यावर शुभेच्छा आणि हृदयस्पर्शी आश्चर्यांचे सूक्ष्म संकेत येतील. तुमच्या गोड हास्याने तुम्ही इतरांना आनंदित करता तेव्हा तुम्ही तुमच्या आयुष्यात सहजतेने आनंद आणि सकारात्मकता पसरवाल.

वृश्चिक : आज तुमच्याकडे प्रलंबित कामे पूर्ण करण्याचे आश्वासन आहे जी कदाचित तुम्ही पूर्वी करू शकला नसाल. नशीब तुमच्या बाजूने आहे, ज्यामुळे तुम्ही आव्हानांवर मात करू शकाल आणि रखडलेली कामे सहज पूर्ण करू शकाल.

धनु : आजच एका शांत आणि मनमोहक प्रवासाला सुरुवात करा. निसर्गाशी आणि प्रिय साथीदाराशी जोडले जा, शांत वातावरणात सुंदर आठवणी निर्माण करा. प्रत्येक पोशाख तुम्हाला अखंडपणे शोभेल.

मकर : व्यावसायिक आणि वैयक्तिक दोन्ही बाजूंनी स्थिरतेची अपेक्षा करा. तुमच्या बॉस आणि कुटुंबाला संतुष्ट करण्यासाठी कठोर परिश्रमावर लक्ष केंद्रित करा, परंतु दिवसभर मध्यम गती ठेवा. आज तुमच्या शरीरातून आरोग्य आणि सकारात्मकता पसरते आणि तुमच्या स्वतःच्या काळजीच्या प्रयत्नांचे प्रदर्शन होईल.

कुंभ : आज उत्साह तुमच्या ध्येयांना चालना देईल. नवीन उपक्रम आणि शिकण्याच्या संधी स्वीकारा. तुमच्या वागण्यातून उदासीनतेचे ओझे दिसून येऊ शकते, कदाचित अंतर्गत अशांततेमुळे. मनमोकळेपणा टाळण्यासाठी तुमच्या विचारांबद्दल जागरूक रहा.

मीन : वर्तमान क्षणाला स्वीकारा! भविष्याबद्दलच्या चिंता असूनही, येथे आणि आताच्या परिस्थितीत समाधान आणि समाधान मिळवा. कृतज्ञता तुमचा दृष्टिकोन वाढवेल आणि तुमचे अनुभव समृद्ध करेल.

लग्न, व्यवसाय, शिक्षण, नोकरीत येणाऱ्या अडचणी, करिअर, कोणतेही काम करताना येणारे अपयश, कर्जबाजारी होणे, कोणतेही काम पूर्ण न होणे, वास्तू दोषामुळे येणाऱ्या अडचणी व अपयश, सतत घरात कलह होणे, अडकलेले पैसे, फसवणूक यावर १००% मार्गदर्शन मिळेल.
विवाहास अडचण असेल तर एकदा नक्की मार्गदर्शन घ्या.
ऑनलाईन मार्गदर्शन उपलब्ध

संपर्क – सौ. कांचन थिटे
ज्योतिष, अंक वास्तू शास्त्र प्रवीण, विवाह (M. S. ), वास्तू तज्ञ
तडवळे रोड, नवीन एस. टी. स्टँड जवळ, कोरेगाव, सातारा
वास्तू मार्गदर्शन, विना तोडफोड वास्तुदोष जाण्यासाठी अगदी छोट्या गोष्टी आणि सोप्या उपाय योजना
। १००% रिझल्ट । एकदा नक्की सल्ला घेऊन बघा ।

## पाथर्डीत संत ज्ञानेश्वर विद्यालयात

# बाल आनंद मेळावा व हळदी-कुंकू समारंभ उत्साहात



**पाथर्डी**
सार्व मंथन । प्रतिनिधी

पाथर्डी तालुक्यातील संत ज्ञानेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय येथे आज पालकशिक्षक मेळावा, बाल आनंद मेळावा तसेच हळदी–कुंकू समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या उपक्रमांना पालक, विद्यार्थी व शिक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून, विशेषतः महिलांची उपस्थिती लक्षणीय होती.

या कार्यक्रमाचे उद्घाटन पाथर्डी पंचायत समिती शिक्षण विभागाचे गटशिक्षणाधिकारी शिवाजीराव कराड, विस्तार अधिकारी निलेशजी क्षीरसागर व केंद्रप्रमुख पोळ यांच्या उपस्थितीत झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सहदेव दादा शिरसाट, तर संस्थेचे अध्यक्ष अनिल भाऊ शिरसाट व सचिव महेंद्र शिरसाट हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

पालकशिक्षक मेळाव्यात विद्यालयाचे प्राचार्य मिसाळ सर यांनी शाळेतील शैक्षणिक प्रगती, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणारे उपक्रम, आषाढी दिंडी, गणपती उत्सव, चालू शैक्षणिक वर्षातील तालुका गणित प्रदर्शन, विविध क्रीडा स्पर्धांमधील यश तसेच विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी घेतले जाणारे उपक्रम यांची सविस्तर माहिती पालकांना दिली.

यावेळी संस्थेचे सचिव महेंद्रजी शिरसाट यांनी शाळेच्या भविष्यातील नवनवीन शैक्षणिक संकल्पना व विकासात्मक योजना पालकांसमोर मांडल्या. याच दिवशी आयोजित बाल आनंद मेळाव्यात विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेत स्वतःचे स्टॉल उभारले. काही विद्यार्थ्यांनी आपल्या शेतातील भाजीपाला व फळे विक्रीस आणली, तर काहींनी वडापाव, भजे, कडधान्य भेळ, थंड पेये आदी पदार्थ तयार करून विक्री केली. शिक्षक व पालकांनी ग्राहक म्हणून सक्रिय सहभाग नोंदविला.

**मुळव्याध, मुतखडा व भगंदर त्वचारोग आयुर्वेदिक औषधाने बरा**

मुळव्याध रक्त पडणे, कोंब, आग होणे, भगंदर, शौचास त्रास तसेच मुतखडाचे सर्व आजारावर–आयुर्वेदिक औषध मुतखडा (किडनी स्टोन) १ एमएम ते ४० एमएमचे–खडे औषधाने विरघळतात. पोट, कंबर, गुडघे दुखणे यावर आयुर्वेदिक रामबाण औषध ऑपरेशनची गरज नाही, त्वचा रोग संबंधी सर्व औषध उपलब्ध आयुर्वेदिक बरे झालेले पेशंटचे व्हिडिओ पहायला मिळेल.
संपर्क–अशोकराव पालवे वांजुळपोई, ता. राहुरी मो. नं. ९३७०५०४७७६
(३० डिसेंबर)

**राहुरीत गाळे भाडोत्री देणे आहे**

राहुरी मार्केट यार्ड मधील शेतकरी भवन मागे एक हॉल ४९ बाय ३४ व ११ बाय ३४ चे गाळे भाडोत्री देणे आहे. तरी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा.
संपर्क–९४०४५३९७०७, ९८८१७६०३२४
(०६ डिसेंबर)

फिक्स चान्स के लिए संपर्क करे
100% कोहिनुर Rs. 100/-
कल्याण राजधानी नाईट साप्ताहिक
साप्ताहिक Date : 19.1.26
कल्याण - राजधानी (डे/ना) मेन बाजार (ओपन) या (क्लोज) मेन बाजार
Date : 19.1.26

| | | | |
|---|---|---|---|
| 2 237 390 679 | 7 269 368 467 | 4 149 158 590 | 9 180 478 568 |
| 3 580 670 689 | 8 170 378 567 | 5 230 258 780 | 0 235 370 578 |
| 4 149 158 167 | 9 180 289 478 | 6 150 259 358 | 1 100 380 560 |
| 5 168 690 780 | 0 190 389 569 | 7 278 250 890 | 2 237 345 570 |
| 6 367 349 790 | 1 128 245 489 | 8 125 189 459 | 3 346 490 670 |
| 7 278 250 890 | 2 129 138 147 | 9 360 450 469 | 4 149 167 789 |

कायमचा मेंबरसाठी संपर्क साधा (अंकशास्त्रावर आधारित दुर उपयोग करु नये)

फिक्स चान्स के लिए संपर्क करे
100% कोहिनुर Rs. 100/-
कल्याण राजधानी नाईट साप्ताहिक
साप्ताहिक Date : 19.1.26
कल्याण राजधानी (डे/ना) मेन बाजार (ओपन) या (क्लोज) मेन मुंबई
100% Date Fix FREE GAME Open to Close

| सोमवार ते मंगळवार | बुधवार ते गुरुवार |
|---|---|
| 4 338 699 9 388 144 — 40 - 45 x 90 - 95 | 5 366 447 0 118 299 — 51- 56 X 01- 06 |

| शुक्रवार ते शनिवार | साप्ताहिक |
|---|---|
| 1 227 588 6 277 330 — 12 - 17 x 62 - 67 | 2 336 499 7 188 449 — 23 - 28 X 73 - 78 |

साप्ताहिक CP 56 X 45 67 X 34 12 X 23
विचार बदला नशीब बदलेल
संपर्क : 9970640587

## योजनांच्या अंमलबजावणीसाठी प्रशासनाने

# गतिमान होऊन पारदर्शकपणे काम करावे

### जलसंपदामंत्री डॉ. राधाकृष्ण विखे; श्रीरामपूर येथे शासकीय विभागांच्या कामकाजाचा आढावा

**शिर्डी**
सार्व मंथन । प्रतिनिधी

राज्य शासनाच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विविध लोककल्याणकारी योजनांचा लाभ तळागाळातील सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रशासनाने अधिक गतिमान व पारदर्शकतेने काम करणे आवश्यक आहे. शासकीय निधीतून होणाऱ्या विकासकामांची गुणवत्ता व उपयोगिता जपली जाणे बंधनकारक असून, प्रशासकीय अधिकाऱ्यांनी कोणत्याही दबावाखाली न येता नियमानुसार व पूर्ण क्षमतेने काम करून नागरिकांचे प्रश्न सोडविण्याला प्राधान्य द्यावे, अशा सूचना राज्याचे जलसंपदामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे यांनी दिल्या.

श्रीरामपूर येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयात तालुक्यातील विविध शासकीय विभागांच्या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी आयोजित बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस उपविभागीय अधिकारी किरण सावंत, तहसीलदार मिलिंदकुमार वाघ, अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे, जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता स्वप्निल काळे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

ग्रामपंचायत स्तरावरील कामांचा आढावा घेताना मंत्री डॉ. विखे पाटील म्हणाले, प्रत्येक ग्रामपंचायतीने विकासाचा रोडमॅप तयार करून वर्षभरातील योजनांच्या अंमलबजावणीचा सविस्तर अहवाल तयार करावा.

शिक्षण विभागाचा आढावा घेताना ते म्हणाले, शासकीय शाळांमधील विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी स्वच्छतागृहांची निर्मिती व त्यांची नियमित देखभाल करण्यासाठी निश्चित कार्यपद्धती तयार करावी. शाळा व्यवस्थापन समिती व मुख्याध्यापकांवर जबाबदारी निश्चित करून स्वच्छतागृहे वापरण्याजोगी ठेवावीत. तसेच, अंगणवाड्यांमधील पोषण आहाराची गुणवत्ता तपासण्याचे काम जिल्हास्तराऐवजी स्थानिक पातळीवरील प्रयोगशाळेत करावे, अशा सूचना त्यांनी दिल्या.

महावितरण विभागाने शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा करण्याच्या राज्य शासनाच्या धोरणांतर्गत सौर कृषी वाहिन्या व उपकेंद्रांची कामे वेगाने पूर्ण करावीत. यासाठी आवश्यक शासकीय जमिनींच्या हस्तांतरणाची प्रक्रिया महसूल विभागाशी समन्वय साधून तातडीने पूर्ण करावी. कृषी विभागाने नैसर्गिक शेती व संशोधनावर भर द्यावा, तसेच शेतकरी उत्पादक कंपन्यांना शेतमाल प्रक्रिया व विपणन क्षेत्रात काम करण्यासाठी प्रोत्साहित करावे.

आरोग्य विभागाने शासकीय रुग्णालयांमधील प्रसूतींची संख्या वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत व वैद्यकीय अधिकाऱ्यांनी मुख्यालयी उपस्थित राहून रुग्णसेवेचा दर्जा उंचावण्यावर भर द्यावा, असे निर्देश त्यांनी दिले.

शिर्डी एमआयडीसीमध्ये उभारण्यात येणाऱ्या संरक्षण साहित्याच्या प्रकल्पामुळे जिल्ह्याच्या औद्योगिक विकासाला चालना मिळून रोजगारनिर्मिती होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

शहरातील स्वच्छता, सौंदर्य व सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी नगरपरिषदेने सतर्क राहून काम करणे



अपेक्षित आहे. अनधिकृत फलक व अतिक्रमणे काढून रस्ते व चौक मोकळे करावेत. शहरातून जाणाऱ्या कालव्याच्या दुतर्फा असलेला परिसर अतिक्रमणमुक्त व स्वच्छ ठेवावा. तसेच, म्हाडाच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या घरकुल प्रकल्पाच्या कामाला पालिकेने गती द्यावी, असे निर्देशही पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांनी दिले.

---

## निधनवार्ता

### शंकरराव पगारे यांचे निधन



सार्व मंथन ✍ राहुरी फॅक्टरी । राहुरी फॅक्टरीतील गुरुकुल वसाहत येथील शंकरराव नाथू पगारे (वय ८१) यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले आहे. शंकरराव पगारे यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा मोठा परिवार होता. देवळाली प्रवरा नगरपरिषदेचे माजी उपनगराध्यक्ष भाऊसाहेब पगारे,अरुण पगारे व रावसाहेब पगारे यांचे ते वडील होत.

### राहीबाई शिंदे यांचे निधन



सार्व मंथन ✍ भोकर । श्रीरामपूर तालुक्यातील भोकर येथील प्रगतशिल शेतकरी कुटूंबातील राहीबाई धोंडीराम शिंदे (वय ८५) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, जावई, नातवंडे व परतवंडे असा परिवार आहे. येथील प्रगतशिल शेतकरी अशोक व बाळासाहेब धोंडीराम शिंदे यांच्या त्या मातोश्री होत तसेच शिरूर येथील फेब्रीकेशन व्यावसायिक धनंजय अशोक शिंदे यांच्या त्या आजी होत.

---

## कोरडगाव येथील कब्रस्तान जमिनीवर अतिक्रमण

### न्यायालयीन स्थगितीचा भंग; प्रशासनाकडे तातडीच्या कारवाईची मागणी

**पाथर्डी**
सार्व मंथन । प्रतिनिधी

पाथर्डी तालुक्यातील कोरडगाव येथे मुस्लिम समाजाच्या कब्रस्तान (दफनभूमी) जमिनीवर अनधिकृत अतिक्रमण झाल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला असून, संबंधित व्यक्तीने न्यायालयीन स्थगिती आदेशाचे उल्लंघन केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी समस्त ग्रामस्थ मुस्लिम समाज, कोरडगाव यांच्या वतीने प्रांत अधिकारी पाथर्डी यांच्याकडे लेखी तक्रार निवेदन सादर करण्यात आले आहे.

कोरडगाव येथील कब्रस्तानची जमीन सीटीएस क्रमांक ५६२, क्षेत्रफळ १९४७.८० चौरस फूट असून, सदर जागेवर विठ्ठल भीमा मासाळ यांनी अनधिकृतपणे कब्जा केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी संबंधितांविरोधात सिव्हिल सूट नं. १२०/२०२५ दाखल असून, माननीय न्यायालयाने स्पष्ट स्थगिती आदेश दिला



आहे. तसेच, हॉनरेबल महाराष्ट्र वक्फ ट्रिब्युनल, औरंगाबाद यांचाही त्या जागेबाबत स्थगिती आदेश लागू असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

असे असतानाही संबंधित व्यक्तीने न्यायालयीन आदेशास धुडकावून लावत कब्रस्तानच्या जागेवर आरसीएम बांधकाम करून तेथे राहण्यास सुरुवात केली, तसेच अनधिकृत नळ कनेक्शन व वीज कनेक्शन घेतल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या प्रकारामुळे धार्मिक भावना दुखावल्या जात असून, परिसरात कायदा व सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असल्याचे ग्रामस्थांनी स्पष्ट केले आहे.

या पार्श्वभूमीवर प्रशासनाने तातडीने दखल घेऊन मेहरबान हायकोर्ट व वक्फ ट्रिब्युनलच्या स्थगिती आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी संबंधितावर तात्काळ गुन्हा दाखल करावा, तसेच कब्रस्तानवरील अतिक्रमण त्वरित हटवून दफनभूमीचे संरक्षण करावे, अशी ठाम मागणी मुस्लिम समाजाच्या वतीने करण्यात आली आहे.

हे निवेदन उपजिल्हाधिकारी कार्यालय, पाथर्डी येथे सादर करण्यात आले असून, त्यावेळी नायब तहसीलदार विजय दगडकर यांनी निवेदन स्वीकारले. या निवेदनावर काँग्रेस पाथर्डी तालुका अध्यक्ष नासीर शेख यांच्यासह अकबर शेख, अमर शेख, मुबारक शेख, अकबर मनियार, महबूब शेख, राजू शेख, इनूस शेख, जाहीर शेख, आरिफ शेख, एजाज शेख, अलीम शेख आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत. दरम्यान, प्रशासनाने वेळेत हस्तक्षेप न केल्यास कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर बनू शकतो, असा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे.

---

## देवळालीत खंडोबा महाराज यात्रा उत्सवाची तयारी

**देवळाली प्रवरा**
सार्व मंथन । प्रतिनिधी

देववल्ली अर्थात देवळाली प्रवरा देवांच्या भूमित देवांची पंगत बसली होती, त्यावेळी वेषभूषा करून राहु राक्षस पंगतीत बसला होता त्यावेळी राजा मल्हारीने त्याचे धड वेगळे केले ते राहुरीत जावून पडले म्हणून राहुरी नाव पडले अशी आख्यायिका सांगितली जाते.

देवळाली प्रवरा येथील नैसर्गिक वातावरणात गावातील दक्षिणेला खडकाळ जागेवर कुलदैवत खंडोबा महाराज यांचे मंदिर आहे, छत्रपती शिवाजी महाराज यांनी ह्या देवस्थानाला जमीन इनाम दिली आहे, ह्या देवस्थानचा मान श्रीमंत चंद्रभान पाटील कदम यांच्या कुटुंबाकडे आहे, अजित सर्जेराव पाटील कदम यांनी ह्या मंदिराचा जीर्णोद्धार पंचक्रोशीतील खंडोबा भक्ताच्या मदतीने केला आहे, हेमाडपंती मंदिर आहे, आणि उत्कृष्ट कोरीवकाम केलेले आहे, अजित पाटील कदम यांच्या अध्यक्षतेखाली खंडोबा यात्रा उत्सव माघ पोर्णिमा



रविवार दिनांक १ फेब्रुवारी आणि २ फेब्रुवारी रोजी संपन्न होत आहे. धार्मिक सांस्कृतिक कार्यक्रम आणि तसेच करमणुकीचे कार्यक्रमाने, देवळाली प्रवरा येथे अतिशय चैतन्यमय वातावरणाने आनंदात साजरा केला जातो.

छबिना चाळीसगाव, वैजापूर पाटोदा, बारामती, येथील ब्रास बॅड, हजेरी लावून जातात, रात्री आतषबाजी मध्ये सोलापूर, वांबोरी, पुणे (सोनी फायर वर्क्स)ह्यांचा सामना होतो, सोमवारी जंगी कुस्ती हंगामा मध्ये मानाची मल्हार केसरीच्या चांदीची गदा जिंकण्यासाठी नामवंत पहिलवान भाग घेतात, रात्री पुणे येथील लावण्याच्या फडात श्रोते आपला आनंद लुटत असतात.

---

## डॉ. धनंजय कर्डिले संरक्षण खात्यात ‘कॅप्टन’ पदावर

**सोनई**
सार्व मंथन । प्रतिनिधी

नेवासा तालुक्यातील गेवराई येथील प्राध्यापक ज्ञानदेव कर्डिले यांचे चिरंजीव डॉक्टर धनंजय यांची भारतीय सैन्य दलामध्ये ‘कॅप्टन’ पदावर नुकतीच निवड करण्यात आली आहे.



कर्डिले यांची इंडियन आर्मी मेडिकल क्रॉप्स तर्फे नुकतीच निवड चाचणी झाली होती. त्यात त्यांना अतिशय खडतर चाचण्यांमध्ये डॉक्टर धनंजय कर्डिले यांची निवड झाली आहे. डॉक्टर धनंजय यांचे प्राथमिक शिक्षण पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथील नवोदय विद्यालय येथे झाले. त्यानंतर एमबीबीएस नगर तालुक्यातील विळद येथील डॉ. विखे पा. कॉलेज मधून पूर्ण केले.

वडील प्राध्यापक ज्ञानदेव कर्डिले,आई सविता कर्डिले हे शेवगाव येथील आदर्श विद्यालय येथे शिक्षक आहेत. शिंगणापूर देवस्थानचे माजी विश्वस्त डॉक्टर वैभव शेटे यांचे ते मावस भाऊ व प्रसिद्ध निवेदक एस बी शेटे यांचे ते भाचे असून सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन केले जात आहे.

आमदार विठ्ठल लंघे, आदर्श विद्यालयाचे अध्यक्ष जयश्रीताई गडाख,सचिव रविराज गडाख, देवस्थानचे माजी विश्वस्त व मुळा कारखान्याचे संचालक बापू तात्या शेटे यांनी अभिनंदन केले आहे. ड

ॉक्टर धनंजय हे संरक्षण खात्यातील नवतंत्रज्ञान अवगत करण्यासाठी तेलंगणा राज्यातील सिकंदराबाद येथे पुढील प्रशिक्षणासाठी रवाना झालेले आहे.

---

## राहुरीच्या गंगापूर परिसरातून

# अल्पवयीन मुलीचे अपहरण

**सात्रळ**
सार्व मंथन । प्रतिनिधी

राहुरी तालुक्यातील गंगापुर परिसरातून एका अल्पवयीन मुलीला दि.१२ जानेवारी रोजी पहाटेच्या सुमारास तीच्या राहत्या घरातून अपहरण करून पळवून नेल्याची घटना उघडकीस आली.

सदर १४ वर्षे ६ महिने वय असलेली अल्पवयीन मुलगी तीच्या कुटुंबासह राहुरी तालुक्यातील गावात राहते. दि. ११ जानेवारी रोजी रात्री पिडीत मुलगी व घरातील इतर लोक जेवण करुन झोपी गेले होते. दि. १२ जानेवारी २०२६ रोजी पहाटे २ वाजे दरम्यान पिडीत मुलीचे वडील झोपेतून उठले असता त्यांना त्यांची मुलगी घरात दिसली नाही. नातेवाईकांनी मुलीचा परिसरात व नातेवाईकांकडे शोध घेतला. मात्र ती कोठेही आढळून आली नाही. कोणीतरी अज्ञात इसमाने मुलीला कशाचे तरी आमीश दाखवुन पळवन नेले, अशी नातेवाईकांची खात्री झाली. त्यानंतर पिडीत मुलीच्या वडिलांनी राहुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. त्या फिर्यादीवरून अज्ञात आरोपी विरोधात अपहरणचा गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.नि. संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे.

---

## ‘साई आदर्श’च्या बारागाव नांदूर शाखेचा उद्या शुभारंभ

**बारागाव नांदूर**
सार्व मंथन । प्रतिनिधी

साई आदर्श को–ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी, राहुरी यांची बारागाव नांदूर (ता. राहुरी) येथे नवीन शाखा सुरू होत असून, या शाखेचा भव्य शुभारंभ शनिवार, दि. २४ जानेवारी रोजी सकाळी १० वाजता आयोजित करण्यात आला आहे.

या शुभारंभ सोहळ्याचे उद्घाटन वरद विनायक धाम, लोणीचे महंत उद्धव महाराज मंडलिक यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मल्टीस्टेट फेडरेशनचे अध्यक्ष सुरेशराव वाबळे हे उपस्थित राहणार आहेत.

यावेळी प्रमुख पाहुणे व मान्यवर म्हणून संजय ठेंगे (पोलीस निरीक्षक, राहुरी), प्रभाकर गाडे (सरपंच), सुरेखाताई धनवडे (उपसरपंच), शिवाजीराजे पवार (अध्यक्ष, तंटामुक्ती समिती), मच्छिंद्र कोहकडे सर, श्रीराम गाडे, विश्वास तात्या पवार, सत्यवान पवार, भाऊसाहेब गाडे, जालिंदर गाडे, धनराज गाडे, शकुंतला गाडे, वसंतराव गाडे, बाळासाहेब गाडे, पंढरीनाथ पवार, युवराज गाडे, गोरख गाडे, अर्जुन गाडे सर, डॉ. तनवीर देशमुख, चांगदेव गाडे यांच्यासह बारागाव नांदूर ग्रामस्थ व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

या कार्यक्रमास परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन साई आदर्श मल्टीस्टेटचे चेअरमन शिवाजीराव कपाळे व संचालक मंडळ यांनी केले आहे.

---

## राहुरीत शेतकऱ्याची विद्युत मोटार चोरी

**राहुरी**
सार्व मंथन । प्रतिनिधी

राहुरी शहरातील बारागाव नांदूर रोड परिसरात शेतकऱ्याची विद्युत मोटार चोरीस गेल्याची घटना समोर आली आहे. आसिफ शफिका खान (रा. राहुरी) या शेतकऱ्याच्या शेतातून दिनांक १८ जानेवारी रोजी अज्ञात चोरट्याने विद्युत मोटार चोरून नेली.

आसिफ खान यांनी आपल्या शेतात पिकांना पाणी देण्यासाठी लावलेली विद्युत मोटार दिनांक १८ जानेवारी रोजी सकाळी शेतात गेल्यावर आढळून आली नाही.

**अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल**

परिसरात शोध घेतल्यानंतरही मोटार न सापडल्याने त्यांनी राहुरी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या प्रकरणी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास राहुरी पोलीस करत आहेत. शेतकऱ्यांच्या शेतातील मोटार चोरीच्या वाढत्या घटनांमुळे शेतकरी वर्गात चिंतेचे वातावरण आहे.

---

# मंदिरात धाडसी चोरी करणाऱ्यांच्या एलसीबीने आवळल्या मुसक्या

### तब्बल १७ गुन्हे दाखल असणारी टोळी गजाआड

**श्रीगोंदा**
सार्व मंथन । प्रतिनिधी

श्रीगोंदा तालुक्यातील बेलवंडी पोलीस स्टेशन हद्दीतील हिंगणी दुमाला या गावात दि.१३ जानेवारी२०२६ रोजी रात्रीच्या वेळेस विठ्ठल रुक्मिणी मंदिरात चोरी झाली होती चोरट्यानी मंदिरातील गावाकऱ्यांनी बसवलेला महादेवाच्या प्रतिकृतीचा १लाख ४८ हजार रुपये किंमतीचा १किलो ८७३ग्रॅम वजनाचा चांदीचा मुखवटा चोरून नेला होता त्यानंतर बेलवंडी पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यानंविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

मंदिरात चोरी झाल्यामुळे ग्रामस्थांच्या भावना लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सदर चोरीच्या तपासाला सुरुवात केली

गुन्हे तपास पथकाने या आधी मंदिर चोरीतील गुन्हे करणाऱ्या आरोपिंचा अभिलेख तपासला तसेच व्यावसायिक कौशल्याच्या आधारे माहिती काढत सदर गुन्हा हा सराईत गुन्हेगार भास्कर खेमा पथवे रा. नां दुरी दुमाला ता. संगमनेर याने व त्याच्या साथीदाराने केल्याचे निष्पन्न झाले त्यानंतर पोलिसांनी आरोपीच्या राहत्या घराच्या परिसरात सलग चार दिवस जाऊन तपास केला परंतु आरोपी हा सतत बाहेरगावी फिरत असल्याचे त्यानंतर तांत्रिक तपासाच्या आधारे सदर आरोपी हा त्याच्या चारचाकी वाहनातून संगमनेर कडून पारनेरच्या दिशेने येणार असल्याची स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला माहिती मिळाली त्यानुसार पोलिसांनी सापळा लावत भास्कर खेमा पथवे, राजेंद्र ठकाजी उघडे दोघे रा नांदुरी यांना ताब्यात घेतले त्यांच्याकडे मंदिर चोरीच्या गुन्ह्याबाबत सखोल चौकशी केली असता सदर चोरी ही संजय भास्कर गावडे रा नांदुरी दुमाला याच्या सोबत मिळून केल्याची कबुली दिली गावडे हा फरार असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

ताब्यात घेतलेल्या दोन्ही आरोपिंकडून ५लाख १०रु किंमतीचा चांदीचा मुखवटा, ३० हजार रु किंमतीचे दोन मोबाईल फोन, रोख रक्कम. ८,४००रु आणि ५२००रु किंमतीची चोरी करण्याकरिता वापरण्यात आलेली हत्यारे, ५ लाख रु किंमतीची तवेरा गाडी क्रं एम एच ०४ सीएम ६७१२ असा एकूण १०लाख ५२हजार६००रु किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला.

ताब्यात घेतलेल्या आरोपीकडे बरकाईने तपास केल्यानंतर त्यांच्याकडून अनेक गुन्हे उघड झाले आहेत.

**सराईत मंदिर चोर, १७ गुन्हे दाखल**

मंदिर चोरीच्या गुन्ह्यात पकडलेला भास्कर पथवे हा सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर पुणे, नाशिक आणि अहिल्यानगर जिल्ह्यात मंदिर चोरीचे जवळपास १७ गुन्हे दाखल आहेत त्याला ताब्यात घेतल्यामुळे अनेक गुन्ह्यांची उकल होण्यास मोठी मदत होणार आहे.

**या पथकाने केली कारवाई**

सदर तपास हा स्थानिक गुन्हे शाखेचे पो नि किरणकुमार कबाडी यांच्या सह पो उप नि महादेव गुट्टे, पो अंमलदार गणेश लोंढे, विजय पवार संतोष खैरे, फुरकान शेख, दीपक घाटकर, भीमराज खर्से, अमृत आढाव बाळासाहेब गुंजाळ, रोहित येमुल, आकाश काळे, योगेश कर्डीले, अरुण मोरे या पथकाने केली.



FinOlex PIPES
घर बांधताय...!
नगर जिल्ह्यात सर्वात कमी दरात फिनोलेक्स मटेरियल!
तर मग चला, प्लंबिंग पी.व्हि.सी सॅनिटरी आणि टाईल्स करिता...
सुनिल सेल्स कॉर्पोरेशन
बारागाव नांदूर रोड, राहुरी, जि. अ.नगर
। प्रोप्रा. सुनिल भट्टड ९८२२ ४२८६९९ । विजय भट्टड ९८९०४३३४१०

सायं. दैनिक
# सार्वमंथन
नवी दिशा, नवी आशा
शुक्रवार, दि. २३ जानेवारी २०२६ पान ०४

मराठी व इंग्रजी कॉम्प्युटर टायपिंग
शासकीय-निमशासकीय कार्यालयातील कोणत्याही पदाच्या नोकरीसाठी उपयुक्त नव्हे तर अनिवार्य असा MPSC च्या सर्व पोस्टसाठी लागू असलेला
शासकीय कॉम्प्युटर टायपिंग कोर्स
महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त : अधिकृत प्रशिक्षण केंद्र
✻ क्लासची वैशिष्ट्ये ✻
। महाराष्ट्र शासनाचे अधिकृत प्रमाणपत्र
। सुसज्ज कॉम्प्युटर लॅब
। गरजू विद्यार्थ्यांसाठी माफक फी
विघ्नहर कॉम्प्युटर
अधिक माहितीसाठी संपर्क
धोंडे पाटील कॉम्प्लेक्स, गोकुळ कॉलनी, कॉलेज रोड, राहुरी
98 60 87 29 18 ☎ : 02426-295118
२० फेब्रुवारी २५

## मंथन फटकारे

अनुसंगम तथा बाळासाहेब शिंदे
मो. ९५०३९५९९५७

महापौर आरक्षण सोडत फिक्स केल्या होत्या–वडेट्टीवार

**– आता फक्त प्रत्येक गोष्टीला फिक्स–फिक्स म्हणून ओरडायचे?एवढ्या काळात एखादे लोकआंदोलन पूर्ण देशभर झाले असते?**

एस.टी.फोडून ई.व्ही.एम. विरोधात आंदोलन–वृत्त

**– ईव्हीएम मशीन, एस.टी. बसगाड्या फोडा नाहीतर काहीही फोडा?त्याचा परिणाम सरकारवर होतो का?**

अकोट, अचलपूर नगर परिषदेत भाजप–एमआयएम ची अभद्र युती–वृत्त

**– सत्तेसाठी''हिंदू''खतऱ्यात आणून युती झाली वाटतं?अंधभक्त याची दाखल घेतील हि अपेक्षा!**

सत्तेसाठी मनसेच्या इंजिनने दिशा बदलली–वृत्त

**– सत्तेशिवाय''मजा व मलिदा''मिळत नाही?याचा अंदाज आल्याने इंजिनने दिशा बदलली वाटतं?**

माझे स्वतःचे मत मला पडले नाही–अपक्ष उमेदवार

**– पुढची निवडणूक नक्कीच लढवा!तुम्हांला काहीतरी मते पडतील अशी सेटिंग ईव्हीएम करून ठेवील?**

राहुरी नगर परिषदेत चहापेक्षा किटली गरम–वृत्त

**– काही''किटल्या''तर आम्ही शहराचे सर्वेसर्वा झाल्यासारखे फिरतात?नेतेमंडळी त्या किटल्या गार करतील?अशी नागरिकांची अपेक्षा!**

पान १ वरून पान १ वरून

## नोंदणीसाठी फक्त २ दिवस शिल्लक

यादीतील मयत किंवा दुबार नावे वगळण्यासाठी 'नमुना नं. ७' आणि एका भागातून दुसऱ्या भागात नाव स्थलांतरित करण्यासाठी किंवा तपशिलातील (नाव, वय, लिंग, फोटो) दुरुस्तीसाठी 'नमुना नं. ८' भरून देता येईल. मतदारांना घरबसल्या ही प्रक्रिया पूर्ण करता यावी, यासाठी निवडणूक आयोगाने संकेतस्थळ आणि ही मोबाईल सुविधा उपलब्ध करून दिली आहे. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. पंकज आशिया आणि राहुरीच्या मतदार नोंदणी अधिकारी वर्षा पवार यांनी मतदारसंघातील सर्व पात्र नागरिक व राजकीय पक्षांना या प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले आहे. मुदत संपण्यास अत्यंत कमी कालावधी उरला असल्याने, ज्यांचे नाव अद्याप यादीत नाही किंवा ज्यांना तपशिलात बदल करायचे आहेत, त्यांनी २४ जानेवारीपूर्वी विहित नमुन्यात अर्ज सादर करावेत, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

## 'महा निर्यात इग्नाइट' मधून...

निर्यातक्षम उत्पादन ही जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाची महत्त्वाची गुरुकिल्ली आहे. केंद्र व राज्य शासनाच्या विविध उद्योगविषयक, स्टार्टअप तसेच निर्यात प्रोत्साहन योजनांचा प्रभावी लाभ घेतल्यास जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मितीबरोबरच निर्यातवाढीसही चालना देता येईल. जिल्ह्यातील कृषीपूरक उद्योग, दुधजन्य पदार्थ प्रक्रिया, अन्नप्रक्रिया व मूल्यवर्धित उत्पादनांमधून देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत निर्यातीच्या मोठ्या संधी उपलब्ध असल्याचेही त्यांनी सांगितले. प्रशासनाच्या वतीने उद्योग उभारणीसाठी आवश्यक परवानग्या, सुलभीकरण, मार्गदर्शन व विविध यंत्रणांमधील समन्वयासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्यात येत असून, उद्योजकांनी नावीन्यपूर्ण कल्पना, आधुनिक तंत्रज्ञान, दर्जेदार उत्पादन आणि जागतिक मानकांचा अवलंब करून आंतरराष्ट्रीय स्पर्धेत टिकून राहण्यासाठी सज्ज व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले. औद्योगिक धोरण व सद्यस्थितीबाबत मार्गदर्शन करताना वृषाली सोने म्हणाल्या की, उद्योजकांना निर्यातीसाठी आवश्यक बाबी तसेच निर्यातवाढीच्या संधींबाबत सखोल माहिती मिळावी, या उद्देशाने 'महा निर्यात इग्नाइट कन्व्हेन्शन' या कार्यक्रमाचे आयोजन राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात करण्यात आले आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात उद्योजकतेची सक्षम फळी असून उत्तम कनेक्टिव्हिटी उपलब्ध असल्याने निर्यातवाढीस मोठा वाव आहे. 'एक जिल्हा एक उत्पादन' या उपक्रमांतर्गत जिल्ह्यासाठी साखर व दुग्धजन्य उत्पादने निश्चित करण्यात आली असून, सध्या जिल्ह्यातून सुमारे १ हजार ४७९ कोटी रुपयांची उत्पादने निर्यात केली जात आहेत. निर्यातीसाठी केवळ स्थानिक बाजारपेठेवर अवलंबून न राहता आंतरराष्ट्रीय बाजारपेठेवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. जागतिक बाजारपेठेत टिकून राहण्यासाठी पॅकेजिंग, ब्रँडिंग, गुणवत्ता व आंतरराष्ट्रीय मानकांचे पालन यावर विशेष भर देणे गरजेचे आहे. मैत्री पोर्टलच्या माध्यमातून उद्योजकांना आवश्यक परवानग्या अत्यंत कमी कालावधीत उपलब्ध करून देण्यात येत असून, शासनामार्फत निर्यातवाढीसाठी विविध सवलती, सुविधा व प्रशिक्षण कार्यक्रमही राबविण्यात येत आहेत. उद्योजकांनी या संधींचा लाभ घेत निर्यातवृद्धीसाठी अधिक प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

### अवैध गौण खनिज उत्खनन करणाऱ्यांवर
# 'मोक्का'अंतर्गत कारवाई करा : डॉ. पंकज आशिया

**शिर्डी**
सार्व मंथन । प्रतिनिधी

जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी आज संगमनेर तालुक्याचा दौरा करून प्रशासकीय कामकाजाचा आढावा घेतला. अवैध व्यवसायांबाबत प्रशासनाला कठोर भूमिका घेण्याचे निर्देश दिले. या दौऱ्यात त्यांनी साकुर येथील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प, मियावाकी प्रकल्प, वनराई बंधारे तसेच प्रस्तावित स्मशानभूमीच्या जागेची पाहणी केली. याशिवाय कासारा दुमाला येथील महिला बचत गटाच्या दुग्ध प्रक्रिया केंद्राला आणि निमोण येथील नियोजित सौरऊर्जा प्रकल्पाच्या जागेला त्यांनी भेट दिली.



प्रशासकीय कामांच्या पाहणीसोबतच जिल्हाधिकाऱ्यांनी साकुर व खंडेरायवाडी येथील शेतकऱ्यांच्या थेट बांधावर जाऊन रब्बी पिकांची ई–पीक पाहणी केली व शेतकऱ्यांशी संवाद साधला. यावेळी ई–पीक पाहणी व ॲग्रीस्टॅक योजनेचे काम मोहीम स्तरावर पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी कृषी व महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या.

संगमनेर शहरातील श्वान निर्बीजीकरण केंद्र, ट्रक टर्मिनल व एमआयडीसीमधील उद्योजकांच्या समस्यांबाबतही त्यांनी आढावा घेतला.

तहसील कार्यालयात झालेल्या बैठकीत जिल्हाधिकाऱ्यांनी अवैध वाळू उपसा व गौण खनिज उत्खननाबाबत त्यांनी सूचना दिल्या. वारंवार गुन्हे करणाऱ्या सराईत गुन्हेगारांवर एमपीडीए किंवा मोक्का अंतर्गत कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश त्यांनी पोलीस व महसूल प्रशासनाला दिले. या दौऱ्याप्रसंगी तहसीलदार धीरज मांजरे, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. कुणाल सोनवणे व विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

# एमआयडीसीत अवैध दारू विक्रीवर मोठी कारवाई

**अहिल्यानगर**
सार्व मंथन । प्रतिनिधी

अहिल्यानगर जिल्ह्यात अवैध दारू विक्रीविरोधात कडक भूमिका घेत स्थानिक गुन्हे शाखेने एम.आय.डी.सी. परिसरात धडक कारवाई केली. या कारवाईत विनापरवाना विदेशी दारू विक्री करणाऱ्या एका इसमास अटक करून सुमारे ११ हजार रुपये किमतीची दारू जप्त करण्यात आली आहे.

दिनांक २१ जानेवारी २०२६ रोजी एम.आय.डी.सी. परिसरात गस्त घालत असताना गुप्त बातमीदारामार्फत अहिल्यानगर–छत्रपती संभाजीनगर रोडलगत असलेल्या हॉटेल राजयोग येथे अवैधरीत्या दारू विक्री होत असल्याची माहिती मिळाली. पथकाने तात्काळ छापा टाकून खात्री केली असता संदीप रावसाहेब आव्हाड (वय ४२, रा. पांगरमल, ता. जि. अहिल्यानगर) हा इसम विनापरवाना विदेशी दारू विक्रीच्या उद्देशाने दारूसह मिळून आला.

आरोपीकडून विविध कंपन्यांची सुमारे ११,००० रुपये किमतीची विदेशी दारू जप्त करण्यात आली आहे. याप्रकरणी पोलीस अंमलदार सागर अशोक ससाणे (स्थानिक गुन्हे शाखा) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून एम.आय.डी.सी. पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक श्री. सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली असून, जिल्ह्यात अवैध दारू विक्रीविरोधातील कारवाई यापुढेही अधिक तीव्र करण्यात येणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे.

### श्रीरामपूरात पिण्याच्या पाण्याच्या
# पाईपमधून आले किडे

**श्रीरामपूर**
सार्व मंथन । प्रतिनिधी



श्रीरामपूर शहरातील मोरगे वस्ती भागातील काही घरामध्ये पिण्याच्या पाण्याच्या पाईपलाईन मध्ये पांढरे बारीक किडे आढळून आले हि बाब काही दक्ष महिला भगिनींच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी नगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाशी संपर्क साधला आणि पुरवठा विभागाने कोणाचीतरी पाईपलाईन कुठेतरी लिक असेल असे सांगितले.त्यावेळी महिलांनी नगरपालिकेच्याच पाईपलाईन मधून असे पाणी आले असा दावा केला.

दरम्यान किडे मिश्रित पाण्याचे नेमके गौडबंगाल काय ? याबाबत स्पष्टीकरण पालिका प्रशासनाने देणे गरजेचे आहे. नाही तर हा प्रकार म्हणजे नागरिकांच्या आरोग्याशी खेळ ठरेल.

# सोनईत घरफोडीप्रकरणी दोन आरोपी गजाआड

**सोनई**
सार्व मंथन । प्रतिनिधी

सोनई येथे दि १५ रोजी इंदिरानगर परिसरात घरात घुसून घरातील रोख रक्कमेसह ९० हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला होती या प्रकरणी सोनई पोलीसांनी दोन आरोपींना मुद्देमालासह जेरबंद केले आहे.

अमोल सोमनाथ फुलारे वय ३० यांनी सोनई पोलीस ठाण्यात फिर्याद दिली की दिनांक १५ जानेवारी रोजी दुपारी साडेअकरा वाजता दुपारी दोन च्या दरम्यान इंदिरानगर परिसरातील राहते घराच्या पाठीमागील भिंतीची खिडकी तोडून ४० हजार रुपये रकमेच्या पाचशे रुपयांच्या ८० नोटा व २५ हजार रुपये किमतीचे दहा ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र, १२हजार ५०० रुपये किमतीचे पाच ग्रॅम वजनाचे कर्णफुले व १२ हजार५०० रुपये किमतीचे पाच ग्रॅम वजनाचे सोन्याचे



मंगळसूत्र असा एकूण ९० हजार रुपयाचा मुद्देमाल चोरट्याने चोरून नेला असल्याची फिर्याद दिल्याने सोनई पोलीस स्टेशन ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय माळी यांना गुप्त माहिती मिळाली की सदरचा गुन्हा अमित सोमनाथ फुलारे, मनोज कचरू शिंदे रा. इंदिरानगर सोनई यांनी मिळून केला आहे व हे आरोपी सोनईतील त्रीलिंगी महादेव मंदिराच्या पाठीमागे बेल्हेकरवाडी रस्त्यावर उभे आहेत पोलीस अधिकारी माळी यांनी तात्काळ पोलीस पथक पाठवून त्या ठिकाणावरून दोघा आरोपींना ताब्यात घेतले व आरोपींकडून गुन्ह्यातील पूर्ण मुद्देमाल हस्तगत केला आहे.

सदरची कामगिरी अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, श्रीरामपूर अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे, शेवगाव उपविभागीय पोलीस अधिकारी नीरज राजगुरू यांचे मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय माळी, पोलीस हेडकॉन्स्टेबल बाळासाहेब बाचकर, बाळासाहेब तागड, गणेश गावडे, निखिल तमनर, प्रवीण क्षीरसागर यांनी केली आहे.

# श्रीरामपूरमध्ये किराणा व्यापाऱ्याला लूटले

**श्रीरामपूर**
सार्व मंथन । प्रतिनिधी

श्रीरामपूर शहरातील बेलापूर रोडवरील जुन्या ओझा पेट्रोल पंपाजवळ मंगळवारी रात्री किराणा व्यापाऱ्याला चाकूचा धाक दाखवून व डोळ्यात मिरची पूड फेकत लुटल्याची धक्कादायक घटना घडली. या प्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात दोन अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्रकाश फत्तेचंद बाफना (वय ५५, रा. लबडे वस्ती, श्रीरामपूर) हे मंगळवार, २१ जानेवारी २०२६ रोजी रात्री सुमारे ९ वाजता आपले होलसेल किराणा दुकान बंद करून मालवाहतूक रिक्षातून घरी जात होते. दिवसभराच्या गल्ल्यातील सुमारे ८ हजार रुपये रोकड त्यांच्या जवळ होती. जुन्या ओझा पेट्रोल पंपाजवळ लघुशंकेसाठी थांबले असता दबा धरून बसलेल्या दोन अज्ञात इसमांनी त्यांच्यावर अचानक हल्ला चढवला. अचानक झालेल्या हल्ल्यामुळे बाफना जखमी झाले. या संधीचा फायदा घेत चोरट्यांनी त्यांच्या शर्टच्या खिशातील ८ हजार रुपयांची रोकड जबरदस्तीने काढून घेतली.

# जातिवाचक शिवीगाळ व धमकी प्रकरणी पती–पत्नीविरुद्ध ॲट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा

**पाथर्डी**
सार्व मंथन । प्रतिनिधी

पाथर्डी तालुक्यातील मिरी गावात अनुसूचित जातीतील तरुणी व तिच्या कुटुंबास जातीवाचक शिवीगाळ करून गंभीर अपमान, मानसिक छळ व जीवे मारण्याची धमकी दिल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी पाथर्डी पोलीस ठाण्यात शेजारी राहणाऱ्या पती–पत्नीविरुद्ध अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायद्यान्वये तसेच भारतीय न्याय संहितेनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



याबाबत प्रेरणा दानियल मिरपगार यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, फिर्यादी कुटुंब मिरी गावातील राजवाडा परिसरात वास्तव्यास असून, शेजारील गाळ्याच्या बांधकामावरून व जागेच्या वादातून उज्वला जालिंदर गवळी व तिचे पती जालिंदर चंद्रभान गवळी यांनी फिर्यादी, तिचे आई–वडील व बहिणीस वारंवार जातीवाचक शब्दांत अपमानित केले. तुम्ही महार आहात, तुमची लायकी नाही अशा अवमानकारक शब्दांचा वापर करून सार्वजनिक ठिकाणी अपमान करण्यात आल्याचा आरोप फिर्यादीत आहे. तसेच जीवे मारण्याची धमकी देत सतत मानसिक छळ केल्याचेही नमूद करण्यात आले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी व तिच्या कुटुंबीयांना पाथर्डी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यासाठी सुमारे चार तास ताटकळत थांबावे लागले. अखेर चार तासांच्या प्रतीक्षेनंतरच गुन्हा दाखल करण्यात आल्याने सामाजिक संघटनांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. अशा संवेदनशील आणि गंभीर प्रकरणांत तत्काळ कारवाई होणे आवश्यक असल्याची मागणी होत आहे.

# ...अखेर कोरडगावातील ट्रॅफिक अराजकतेला लगाम

## बेकायदेशीर ट्रॅक्टर–ट्रॉली व अवजड वाहनांवर मोटार वाहन कायद्यान्वये कडक कारवाई

**पाथर्डी**
सार्व मंथन । प्रतिनिधी

पाथर्डी शहरातील कोरडगाव चौकात वाढती वाहतूक कोंडी, बेशिस्त वाहनचालक आणि बेकायदेशीर वाहतुकीमुळे नागरिक त्रस्त झाले असतानाच या संदर्भातील वृत्ताची प्रशासनाने गंभीर दखल घेतली आहे. त्यानुसार दि. २० जानेवारी २०२६ रोजी पाथर्डी पोलीस स्टेशन ट्राफिक विभाग व प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने बेकायदेशीर उस वाहतूक करणारे ट्रॅक्टर–ट्रॉली, ट्रक व अवजड वाहनांवर मोटार वाहन कायद्यान्वये कडक कारवाई करण्यात आली.

कोरडगाव चौक परिसरात चहा टपऱ्या, दुकाने व विविध व्यावसायिक आस्थापनांच्या समोर दुचाकी रस्त्यावरच बेशिस्तपणे उभ्या केल्या जात असल्याने वाहतुकीचा खोळंबा होत होता. अनेक ठिकाणी




दुचाकींच्या डबल–डबल लाईन, नो–पार्किंगमध्ये वाहने उभी करणे तसेच परवानगीविना प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांमुळे अपघाताचा धोका निर्माण झाला होता.

यातच भर म्हणून बेकायदेशीररीत्या उसाची वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टर–डबल ट्रॉली, क्षमतेपेक्षा अधिक भार, तसेच एका ट्रॅक्टरमागे चार–चार ट्रॉली जोडून वाहतूक केल्याचे प्रकार सातत्याने सुरू होते. ही वाहतूक पूर्णतः बेकायदेशीर असून अशा लांब व जड वाहनांमुळे चौकात वळण घेताना नियंत्रण सुटण्याचा आणि मोठा अपघात होण्याचा धोका कायम होता.

या सर्व प्रकारांचा सर्वाधिक त्रास पायी ये–जा करणारे नागरिक, शालेय विद्यार्थी, महिला व वृद्ध यांना सहन करावा लागत होता. अनेक वेळा वाहतूक कोंडीमुळे रुग्णवाहिका व आपत्कालीन सेवांनाही अडथळे येत असल्याचे चित्र होते.

या पार्श्वभूमीवर आज करण्यात आलेल्या संयुक्त कारवाईत उस वाहतूक करणारे ट्रॅक्टर–ट्रॉली, ट्रक व इतर अवजड वाहनांची तपासणी करून नियमभंग करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. काही वाहनांवर मोटार वाहन कायद्यानुसार गुन्हे दाखल करण्यात आले असून, वाहनचालकांना नियमांचे पालन करण्याबाबत स्पष्ट सूचना देण्यात आल्या.

कोरडगाव चौक व पाथर्डी शहरातील वाहतूक कोंडी, बेकायदेशीर उस वाहतूक व अवजड वाहनांमुळे नागरिकांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण झाल्याच्या पार्श्वभूमीवर पाथर्डी पोलीस स्टेशन ट्राफिक विभाग व प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, अहिल्यानगर यांनी संयुक्त कारवाई केली. मोटार वाहन कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली असून, पुढील काळातही अचानक तपासण्या, सातत्यपूर्ण मोहिमा आणि नियमभंग करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असा स्पष्ट इशारा प्रशासनाने दिला आहे. नागरिकांच्या जीवितास प्राधान्य देत, वाहतूक शिस्त लावण्यासाठी पोलीस व आरटीओ विभाग संयुक्तपणे काम करणार असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

सायं. दैनिक सार्वमंथन नवी दिशा, नवी आशा
हे पत्रक मुद्रक, मालक, प्रकाशक अनिल गंगाधर कोळसे यांनी यांच्या स्वराज प्रेस अँण्ड प्रिंटींग येथे ५९३, राहुरी बु।, ता. राहुरी, जि. अहमदनगर (महा) येथे छापून कोळसे दुबीचा मळा, व्यंकोबा मंदीर परिसर, राहुरी, ता. राहुरी, जि. अहमदनगर ४१३ ७०५, (महा.) येथे प्रकाशित केले. संपादक अनिल गंगाधर कोळसे सदर अंकात प्रकाशित झालेल्या लेख बातम्यांच्या मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही. न्यायालयीन वाद–विवाद राहुरी न्याय कक्षेअंतर्गत (खाजगी वितरणासाठी) मुद्रणीय दोष संभवणीय.
RNI No. MAHMAR/2016/72596